UFO digital cinema

Digital Cinema

**Publication: Lokmat, Mumbai. Date: 06 May, 2012**

# यूएफओ : फर्स्ट डे फर्स्ट शो

## महागड्या प्रिंट प्रदर्शन पद्धतीला पर्याय देऊन संपूर्ण देशभरात



संजय गायकवाड

प्रवाह निर्मिती

> ‘फर्स्ट डे फर्स्ट शो ’ देणे केवळ डिजिटल सिनेमाच्या सॅटेलाईट डिलिव्हरी पद्धतीतूनच शक्य झाले. चित्रपट उद्योगातील ही क्रांतीच आहे. एमपीईजी ४ तंत्रज्ञानामुळे आम्हाला सॅटेलाईटच्या माध्यमातून देशभरातील सिनेमागृहांत पाठविणे शक्य झाले आहे.

चित्रफितींच्या या जगतासोबतचा माझा संबंध खिशात पैसे असतील तेव्हा शाळेला दांडी मारून केवळ मॅटिनी शो पाहण्यापुरताच होता. आमची ही ऐष, पुढे टीव्ही आला आणि त्यावर दर आठवड्यास सिनेमा दाखविला जाऊ लागल्यामुळे बंद झाली. माझ्या इंजिनिअरिंग शिक्षणादरम्यानच्या काळात तर सिनेमा पाहण्यासाठी फुरसतच नव्हती. त्या वेळच्या माझ्या दबलेल्या इच्छेची परिणती यूएफओ मूव्हीज इंडिया लिमिटेड कंपनी स्थापण्यात झाली. नशिबाने माझ्यावर अनेक आश्चर्यांचा वर्षाव केला. त्यापैकी बहुतांश आश्चर्ये सुखदच होती.

बालपणी उपकरणांशी खेळण्याचे वेड आणि सॅटेलाईट तंत्रज्ञानातील अनुभव यामुळे माझा आत्मविश्वास मात्र द्विगुणित झाला आहे. मी या तंत्राचा उपयोग विनासायास चित्रपट वितरणासाठी करण्याचा विचार करीत होतो. सध्या या व्यवसायात असलेले सर्व जण सामावले जातील, व्यवसाय करतील आणि बक्कळ पैसा कमावतील, हे माझे पहिले स्वप्न होते.

सध्याच्या डिजिटलायझेशनपूर्वी भारतीय चित्रपट उद्योगाला चित्रपट चोरीची, अर्थात पायरसीची लागण लागली होती. व्यवसायात पारदर्शकतेचा अभाव होता. उत्पन्नाला गळती लागली होती. तसेच चित्रपटगृहाच्या हक्काचे अधिकार मिळण्याची संधी उपलब्ध नव्हती. मग समस्या कोणती होती? चित्रपट उद्योगाचे अंतिम उत्पादन म्हणजे पूर्ण लांबीचा चित्रपट. पण चित्रपटगृहातील गल्ल्याचा विचार केल्यास हे उत्पादन अत्यंत नाशवंत ठरत होते. दहा टक्के हिट चित्रपटांचा अपवाद वगळल्यास बहुतांश चित्रपटांचे एखाद्या चित्रपटगृहातील आयुष्य सरासरी ६ ते १४ दिवसच होते. तेव्हा या छोट्याशा काळात चित्रपटाचे उत्पन्न अधिकाधिक करणे अत्यंत गरजेचे होते. एक चित्रपट एकाच वेळी अधिकाधिक चित्रपटगृहांत प्रदर्शित केला गेला तरच हे शक्य होते.

चित्रपट निर्माते आणि वितरक यांना पारदर्शक पद्धतीने अधिकाधिक ठिकाणी चित्रपट प्रदर्शन होईल, याची आता खात्री मिळाली आहे. प्रदर्शकांना व्यवसायाला नवजीवन मिळाल्याचा आनंद होत आहे. तसेच संपूर्ण देशातील प्रेक्षकांना ते जेथे असतील तेथे चित्रपटाच्या फर्स्ट डे फर्स्ट शोचा आनंद घेता येऊ लागला आहे. उदाहरणार्थ पूर्वी आसामसारख्या भागात नवा चित्रपट देशातील इतर भागांत प्रदर्शित झाल्यापासून दोन महिन्यांनंतर पाहावयास मिळत असे. आता मात्र येथील प्रेक्षक देशातील इतर प्रेक्षकांप्रमाणेच फर्स्ट डे फर्स्ट शोचा आनंद घेऊ शकत आहेत.